THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 19TH MARCH 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८७७ चा हिंदुस्थानचा नोंदण्याचा आक्ट आणि सन १८७२ चा इंडियाचा पुराव्याविषयीं आक्ट, हे सुधारण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थीं सन १८७७ चा हिंदुस्थानचा नोंदण्याचा आक्ट, आणि सन १८७२ चा इंडियाचा पुराव्याविषयीं आक्ट, हे सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे:—

लहान सरनामा व सुरुवात.

१. (१) या आक्टास हिंदुस्थानचा नोंदण्याचा आक्ट सुधारण्याबाबद आक्ट असें ह्मणावें; आणि

(२) तो सन १८९७ च्या जानुआरीच्या पहिल्या तारखेस अमलांत येईल.

सन १८७७ चा आक्ट ३, याच्या ३३ व्या कलमाची सुधारणा.

२. कलम ३३ (अ) ह्यांत, "ज्या रजिस्ट्राराचे डिस्ट्रिक्टांत किंवा ज्या सबरजिस्ट्राराचे सबडिस्ट्रिक्टांत तो राहत असेल त्या" ह्या शब्दांबद्दल "कोणत्याही" हा शब्द दाखल करावा.

सदरहू आक्टाच्या ४७ व्या कलमानंतर नविन कलम दाखल करणें.

३. ४७ व्या कलमानंतर खालील कलम दाखल करावें. तें येणेंप्रमाणें:—

प्रथम नोंदलेल्या दस्तऐवजाचा अमल.

"४७ अ. परंतु जर एकाच मालमिळकतीसंबंधीं एकाच इसमानें एकापेक्षां अधिक दस्तऐवज केले असतील, तर प्रथम नोंदलेल्या दस्तऐवजापुढें मागून नोंदलेला कोणताही दस्तऐवज जरी पूर्वींच्या तारखेस केलेला असला तरी तो रद्द पडेल."

सन १८७२ चा आक्ट १, याच्या ९० व्या कलमाची सुधारणा.

४. इंडियाचा पुराव्याविषयीं आक्ट, याच्या ९० व्या कलमांत "जर तीस वर्षांचा जुना असा ह्मणविणारा अथवा जो तीस वर्षांचा आहे असें साबीत झालें आहे" या शब्दांनंतर खालील शब्द दाखल करावे. ते येणेंप्रमाणें:—

"अथवा हिंदुस्थानच्या नोंदण्याच्या आक्टाअन्वयें नोंदलेला असून बारा वर्षांपेक्षां अधिक जुना असणारा."

### हेतु व कारणें यांचें निरूपण.

सन १८७७ च्या हिंदुस्थानच्या नोंदण्याच्या आक्टाचें कलम ३३ (अ), हें हल्लीं ज्याप्रमाणें आहे व ज्याप्रमाणें त्याचा साधारणपणें अर्थ करण्यांत येतो त्याप्रमाणें त्यावरून मोठी गैरसोय व त्रास सोसावा लागतो. असें वारंवार घडून

येतें कीं, मुखत्यारनामा करून देणारा धनी आपलें राहण्याचें ठिकाण अगर घर सोडून जेव्हां कामासाठीं किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें कांहीं वेळपर्यंत दुसऱ्या सबडिस्ट्रिक्टांत गेलेला असतो, तेव्हां त्यास एखादा दस्तऐवज नोंदण्यासाठीं मुखत्यारनामा करून द्यावा लागतो. त्यानें तो अशा सबडिस्ट्रिक्टाच्या सबरजिस्ट्रारासमक्ष व त्याचे सहीचा कां करून देऊं नये यास कांहीं चांगलें कारण दिसत नाहीं. मुखत्यारनामा करणारानें तो नोंदणाऱ्या अमलदारासमक्ष करून दिला पाहिजे असें कायद्यांत आहे. असा अमलदार, मुखत्यारनामा करून देणाराच्या ओळखीबद्दल आपली खातरी झाल्याशिवाय कधींही मुखत्यारनाम्यावर सही करणार नाहीं. एवढ्यानेंच पुरती खबरदारी राहते, ह्मणून जो जास्त असणारा ठराव गाळण्याचें योजिलें आहे तो केवळ निरर्थक प्रतिबंध होय.

२. कलम ४७ अ हें जास्त दाखल करण्याचें योजिलें असून त्यांतील ठराव फार महत्त्वाचा व अगत्याचा आहे. प्रस्तुत कायद्याचें कलम ४७ याच्या योगानें कपट करण्यास बरीच सवड मिळण्यासारखी आहे. अनें बला आपली मालमिळकत तबदील करून दिली आहे, परंतु त्याबाबदचें खत लगेच नोंदविलें नाहीं. तें नोंदविण्यास कायद्यांत चार महिन्यांची मुदत दिलेली आहे, व कांहीं प्रसंगीं ती आठ महिनेपर्यंत वाढवितां येते, व जर तें ब्रिटिश हिंदुस्थानच्या बाहेर केलें असलें तर त्याची नोंदणी पक्षकारांच्या मर्जीप्रमाणें वर्षांचीं वर्षें तहकूब करतां येते. पहिलें खत नोंदण्यास सांगितलेल्या मुदतींत सदरहू मालमिळकत कला पुनः तबदील करून देण्यास अला कोणताच प्रतिबंध नाहीं. कनें नोंदणीच्या कचेरींत चौकशी केली असतां त्यास अगोदर झालेल्या खताबद्दल कांहींच माहिती मिळणार नाहीं, व तो सहज फसेल. प्रस्तुतच्या कायद्याअन्वयें ब करितां केलेल्या तबदिलीचें खत मागून नोंदलें तर त्याच्यापुढें, क करितां केलेलें खत रद्द पडेल. अशा बाबतींत बहुतकरून, विक्री करणारा व मालमिळकत ज्याकडे प्रथम तबदील होते तो मनुष्य यांमध्यें कांहींतरी समजूत झालेली असते. परंतु त्यांच्यामध्यें संगनमत झालें आहे हें शाबीत करणें फार कठीण पडतें, व ह्या प्रतिस्पर्धी खरीददारांमध्यें न्याय पडला असतां त्याचा परिणाम बहुतकरून असा होतो कीं, विक्री करणारा इसम आपली मालमिळकत दोनदां विकतो व दुसऱ्या खरीददाराचे सर्व हक्क बिकले जातात. असें होणें रास्त नाहीं. जें कलम जास्त दाखल करण्याचें योजिलें आहे, त्यांत अगोदरच्या नोंदणीस अग्रता दिल्यानें सदरहूप्रमाणें कपट करतां येणार नाहीं. अशाच प्रकारचा ठराव, इंग्लंड देशाचा स्टाट्यूट कायदा, ७ अॅन. बा. २० आणि ३८ व ३९ विक्टो. बा. ८७, क. २८ यांत आहे.

३. जे नोंदलेले दस्तऐवज अमुक मुदतीचे, उदाहरणार्थ बारा वर्षांचे जुने, ह्मणजे ज्यांच्याबद्दल दाव्यावरून शंका घेतां येत नाहीं इतके जुने असतील, ते करून दिल्याची शिस्तवार शाबिती न करितां, त्यांचा पुराव्यादाखल उपयोग करण्याचा दिवाणी कोर्टास अधिकार असणें इष्ट आहे. समजूतदार व्यवहारी लोक बहुतकरून नोंदलेल्या दस्तऐवजांवर अशा शिस्तवार शाबितीवांचून भरंवसा ठेवतात व त्यांबरहुकूम काम करतात. तर दिवाणी कोर्टाला योग्य वाटेल तेव्हां अशी शाबिती न करण्याची मोकळीक त्या कोर्टास कां बरें असूं नये? तथापि, जर एकाद्या नोंदलेल्या दस्तऐवजास बरीच हरकत घेण्यांत आली किंवा तो मुकदम्यांतील एकाद्या मुद्याचा विषय असला, तर असें कोर्ट निःसंशय त्याबद्दल पुरावा घेणार आहे. आणि योजलेल्या सुधारणेवरून जें ठरविण्यांत आलें आहे तें हेंच होय. इंडियाच्या पुराव्याविषयींच्या आक्टांत "ग्रहण करूं शकेल" या संज्ञेची व्याख्या येणेंप्रमाणें केली आहे:—

"कोर्ट कांहीं एकादी गोष्ट ग्रहण करूं शकेल असें ह्या आक्टांत ज्या ज्या प्रसंगीं ठरविलें असेल, त्या त्या प्रसंगीं कोर्ट, ती गोष्ट गैरसाबीत झाली नसल्यास, आणि गैरसाबीत होईपर्यंत, ती साबीत आहे असें मानूं शकेल, अथवा तिच्या साबितीविषयीं पुरावा मागूं शकेल."

ही व्याख्या हल्लीं, तीस वर्षांहून अधिक जुने असे दस्तऐवज जरी कोर्टांत हजर करण्यांत येत तोंपर्यंत बाहेर पडलेले नसले तरी त्या सर्वांस लागू आहे. ती व्याख्या, तीस वर्षांहून कमी जुने परंतु नोंदणीच्या कारणानें ज्यांच्या खरेपणाविषयीं अधिक खातरी असते अशा नोंदलेल्या दस्तऐवजांस लागू करण्याचें योजिलें आहे. योजलेल्या सुधारणेच्या योगानें कोर्टाची काम चालविण्याची रीत सोपी होऊन शिस्तवार रीतीनें पुरावा लिहून घेण्याचें काम बरेंच वांचेल, आणि लिलांव विक्रींतील खरीददारांच्या बचावासाठीं न्यायदृष्टया तिची जरूरी दिसते; कारण त्यांना नोंदणीच्या कचेरींतून मिळालेल्या खतांच्या दाखलेसूद नकलांवर मुख्यत्वेंकरून अवलंबून राहवें लागतें व तीं करून दिल्याचा पुरावा त्यांस मिळणें अतिशय कठीण पडतें.

तारीख ९ माहे जानुआरी सन १८९६.

एम्. एम्. राय.

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY. PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.